कायदा व न्याय मंत्रालय

(विधिमंडळ खाते)

नवी दिल्ली, 10 सप्टेंबर 2013, 19 भद्र 1935 (शके)

संसंदेच्या खालील कायद्याला राष्ट्रपतींची 10 सप्टेंबर 2013 रोजी मान्यता प्राप्त झाली आहे व हा कायदा सर्वसामान्याच्या माहितीसाठी प्रसिद्ध केला जात आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, 2013

2013 चा क्रमांक 20

(10 सप्टेंबर 2013)

परवडणाऱ्या किमतीमध्ये दर्जात्मक खाद्याची योग्य मात्रा सुनिश्चित करून, जीवन सन्मानाने जगण्यासाठी मानवी जीवन चक्र दृष्टीकोनातून अन्न व पोषणविषयक सुरक्षा पुरवण्यासाठी कायदा तयार करण्यात आला आहे.

भारतीय गणराज्याच्या ६४ च्या वर्षी संसदेने खालील प्रमाणे अधिनियमित केला आहे.

## अध्याय I

संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.

## प्रास्ताविक

1. (1) हा कायदा राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा 2013 म्हणून ओळखला जाईल.

(२) हा कायदा संपूर्ण भारतात लागू होईल.

(३) 5 जुलै 2013 पासून या कायद्याची अंमलबजावणी केली जाईल.

व्याख्या.

2. या कायद्यात, संदर्भ अन्यथा आवश्यक नाही तोपर्यंत,–

(1) 'अंगणवाडी' म्हणजे कलम 4 अंतर्गत , कलम 5 च्या उपकलम (1) च्या उपवाक्य (a) व कलम 5 व 6 मधील सेवेनुसार केंद्र सरकारच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बाल संगोपन व विकासासाठी स्थापन केलेले केंद्र.

(2) 'केंद्रीय साठा' म्हणजे अन्नधान्य साठा–

(i) किमान मुलभूत किमत कार्यान्वयाद्वारे राज्य सरकार व केंद्र सरकारकडून केलेली खरेदी.

(ii) आपत्ती मदत व अशा अन्य योजनांसह लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वाटपासाठी सांभाळून ठेवलेला.

(iii) उपवाक्य (ii) च्या संदर्भानुसार योजनेचा साठा म्हणून ठेवण्यात येईल.

(3) 'पात्र कुटुंब' म्हणजे कलम ३ च्या उपकलम(1) मधील संदर्भ असलेली अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबा अंतर्गत समाविष्ठ केलेली कुटुंबे.

1995 चा 10

(4) 'स्वस्त धान्य दुकान' म्हणजे लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 च्या कलम 3 अंतर्गत जारी केलेल्या आदेशानुसार जीवनावश्यक वस्तू वितरीत करण्यासाठी प्रमाणपत्रप्राप्त दुकान.

(5) 'अन्नधान्य' म्हणजे तांदूळ, गहू किंवा भरड धान्ये किंवा सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार गुवणत्तेचे निकष असलेली अन्य धान्य संयुगे.

(6) 'अन्न सुरक्षा' म्हणजे अध्याय II अंतर्गत निर्दिष्ट जेवण व अन्नधान्याचा हक्क प्रमाणानुसार पुरवठा करणे.

(7) 'अन्न सुरक्षा भत्ता' म्हणजे कलम 8 अंतर्गत हक्क असलेल्या व्यक्तीस संबंधित राज्य सरकारने देय असलेली पैशाची रक्कम.

(8)' स्थानिक प्राधिकरणा'मध्ये पंचायत, पालिका मंडळ, जिल्हा मंडळ,कन्टोमेंट बोर्ड , शहर नियोजन प्राधिकरण व आसाम, मणिपूर, मेघालय,मिझोराम,नागालँड व त्रिपूरा ज्या राज्यांमध्ये पंचायती अस्तित्वात नाही तेथे विशेष स्थानिक क्षेत्रामध्ये नागरी सेवा नियंत्रण व व्यवस्थापनामधील मंडळ अथवा स्वयं सुशासनासाठी अथवा कोणत्याही इतर प्राधिकरणासाठी दिलेल्या वेळेत कार्यान्वित असलेला कोणाताही कायदा अथवा घटने अंतर्गत दिलेल्या अधिकारानुसार कोणत्याही नावाने कार्यरत असलेले ग्राम मंडळ अथवा समिती अथवा इतर कोणतेही मंडळ.

(9) 'जेवण' म्हणजे केंद्र सरकारने विहीत केल्याप्रमाणे घरी न्यावयाचे धान्य अथवा शिजवलेले गरम किंवा देण्यापूर्वी गरम केलेले जेवण.

(10)'किमान आधारभूत किंमत' म्हणजे केंद्रीय साठ्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार व त्यांच्या संस्थांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलल्या धान्यांवर केंद्र सरकारने घोषित केलेली आधारभूत किंमत.

(11) 'अधिसूचना म्हणजे' राजपत्रामध्ये प्रकाशित केलेली व या कायद्याअंतर्गत जारी केलेली अधिसूचना.

(12) 'इतर कल्याणकारी योजना' म्हणजे योजनेचा भाग म्हणून लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली व्यतिरिक्त अन्नधान्य अथवा जेवण पुरवठा करणारी सरकारची अशी योजना.

1996 चा 1

(13) 'अपंग व्यक्ती' म्हणजे अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्क संरक्षण व पूर्ण सहभाग) कायदा 1955 च्या कलम 2 च्या उपवाक्य( t) मधील व्याख्येप्रमाणे व्यक्ती.

(14) 'प्राधान्य कुटुंबे' म्हणजे कलम 10 अंतर्गत ओळखली जाणारी कुटुंबे.

(15) 'विहित' म्हणजे या कायद्या अंतर्गातील विहित नियम.

(16) 'रेशन कार्ड' म्हणजे लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत स्वस्त धान्य दुकानातून जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी राज्य सरकारची अधिकारीणी अथवा आदेशाअंतर्गत जारी केलेला दस्ताऐवज.

(17) 'ग्रामीण भाग' म्हणजे वेळोवेळी कार्यान्वित केलेल्या कोणत्याही कायद्याअंतर्गत स्थापन

केलेले अथवा स्थापन केलेला कन्टोनमेंट बोर्ड अथवा कोणत्याही शहरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्राबाहेरील राज्यातील कोणतेही इतर क्षेत्र.

(18) ‘अनुसूची’ म्हणजे या कायद्याची जोडलेली अनुसूची.

2007 चा 56

(19) ‘ज्येष्ठ नागरिक ’म्हणजे पालक व ज्येष्ठ नागरिक कायदा, 2007 च्या कल्याण व देखभाल कलम 2 च्या उपवाक्य (h) अंतर्गत व्याख्या केलेली व्यक्ती.

(20) ‘सामाजिक लेखापरिक्षण’ म्हणजे योजना अथवा कार्यक्रमाच्या नियोजन व अंमलबजावणीचे मुल्यांकन व लोकांनी एकत्रिपणे केलेली निरीक्षण प्रक्रीया.

(21) ‘राज्य आयोग’ म्हणजे कलम 16 अंतर्गत स्थापन केलेला राज्य खाद्य आयोग.

(22) ‘संघ प्रदेशा संबंधात राज्य सरकार’ म्हणजे घटनेच्या कलम 239 अंतर्गत नियुक्त केलेला प्रशासक.

(23) ‘लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली’ म्हणजे स्वस्त धान्य दुकानातून रेशन कार्ड धारकांना जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी पद्धत.

(24) ‘दक्षता समिती’ म्हणजे या कायद्याअंतर्गातील सर्व योजनांची अंमलबजावणीवर देखरेखीसाठी कलम २९ अंतर्गत स्थापन केलेली समिती.

1995 चा 10

(25) शब्द व शब्दप्रयोगाची व्याख्या या मध्ये केलेली नसल्यास ती जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 अथवा इतर कोणत्याही संबंधित कायद्यातील व्याख्येनुसार असेल.

# अध्याय II

## खाद्य सुरक्षेसाठी तरतुदी

लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत पात्र कुटुंबातील व्यक्तीला अनुदानित दरात अन्नधान्य प्राप्तीचा हक्क.

3. (1) कलम 10 च्या उप कलम (1) अंतर्गत ओळख असलेल्या प्राधान्य कुटुंबामधील प्रत्येक व्यक्तीला लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत राज्य सरकारच्या अधिसूचि 1 मधील निर्दिष्ट अनुदानित किमतीमध्ये दरमहा पाच किलो अन्नधान्य प्राप्त होईल.

तरतुदीनुसार सदर योजनेमध्ये प्रत्येक राज्याला केंद्र सरकारने निर्दिष्ट केलेल्या अंत्योदय अन्न योजने अंतर्गत प्रत्येक कुटुंबाला अधिसूची 1 मधील निर्दिष्ट किमतीमध्ये दरमहा प्रत्येक व्यक्तीला पस्तीस किलोग्रॅम अन्नधान्य दिले जाईल.

तरतुदीनुसार पुढील प्रमाणे जर कायद्याअंतर्गत कोणत्याही राज्याला अन्नधान्याचे वार्षिक वाटप सर्वसाधारण लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत गेल्या तीन वर्षातील अन्नधान्याच्या सरासरी वार्षिक उचलीपेक्षा कमी असल्यास केंद्र सरकारने निर्धारीत केलेल्या किमतीनुसार संरक्षण दिले जाईल व राज्य सरकारला अनूसूची IV मधील निर्दिष्टीत अन्नधान्य वाटप केले जाईल.

*स्पष्टीकरण*– या कलमाच्या उद्देशासाठी, 'अंत्योदय अन्न योजना' म्हणजे सदर नावाने केंद्र सरकारने 25 डिसेंबर 2000 रोजी सुरू केलेली व त्यानंतर वेळोवेळी सुधारित केलेली योजना.

(2) उपकलम (1) मधील संदर्भ असलेल्या पात्र कुटुंबातील समावेश असलेल्या व्यक्तीच्या हक्काप्रमाणे अनुदानित रक्कम ग्रामीण लोकसंख्येला पंच्याहत्तर टक्क्यापर्यंत व शहरी लोकसंख्येला पन्नास टक्क्यापर्यंत वाढवता येईल.

(3) उपकलम (1) अधीनतेनुसार, केंद्र सरकारने निर्दिष्टीत केलेल्या अशा मार्गदर्शक तत्वानुसार अन्नधान्यांच्या हक्क प्रमाणाएवेजी गहू कणिक पात्र कुटुंबातील व्यक्तींना राज्य सरकारला पुरवठा करता येईल.

गरोदर महिला व स्तनपान करणाऱ्या मातांना पोषणविषयक आधार.

(4) केंद्र सरकारने तयार केलेल्या अशा प्रकारच्या योजनांच्या अधीनतेनुसार, प्रत्येक गरोदर महिला व स्तनपान करणाऱ्या मातेला पुढील प्रमाणे हक्क राहील–

(a) अधीसूची 2 मधील निर्दिष्टीत पौष्टिक मानदंड पूर्ण करण्यासाठी स्थानिक *अंगणवाडी*च्या माध्यमातून गरोदरपणी व मुलाच्या जन्मानंतर सहा महिन्यापर्यंत मोफत जेवण दिले जाईल.

(b) केंद्र सरकारने निर्दिष्टीत केल्याप्रमाणे हफ्त्यामध्ये कमीत कमी सहा हजार रुपये मातृत्व लाभ मिळेल.

तरतुदीनुसार केंद्र सरकार अथवा राज्य सरकार अथवा सार्वजनिक क्षेत्रामध्ये नियमित स्वरुपात रोजगारावर असलेल्या सर्व गरोदर महिला व स्तनपान करणाऱ्या माता अथवा वेळावेळी कार्यान्वित असलेल्या कोणत्याही कायद्याअंतर्गत अशाच प्रकारचा लाभ घेणाऱ्यांना उपवाक्य (b) निर्दिष्टीतनुसार लाभ मिळणार नाही.

बालकांना पोषणविषयक आधार

5. (1) उपवाक्य (~) मधील तरतुदीच्या अधीनतेनुसार, प्रत्येक मुलाला चौदा वर्षापर्यंत खालील हक्कानुसार त्याच्या पोषणविषयक गरजाप्रमाणे लाभ मिळेल, जसे –

(a) जर मुले सहा महिने ते सहा वर्ष या वयोगटातील असल्यास अनुसूची II मधील निर्दिष्टीत पौष्टिक मानदंड पूर्ण करण्यासाठी स्थानिक *अंगणवाडी*च्या माध्यमातून वयोमानाप्रमाणे योग्य मोफत जेवण मिळेल.

अटीनुसार सहा महिन्याखालील वयोगटातील मुलांसाठी पूर्णपणे स्तनपानावरच भर दिला जाईल.

(b) जर मुले आठवी इयत्तेपर्यंत अथवा सहा ते चौदा वर्ष वयोगटातील असल्यास, आवश्यकतेनुसार,अनुसूची 2 मधील निर्दिष्टीत पौष्टिक मानदंड पूर्ण करण्यासाठी स्थानिक संस्था, सरकारी

व अनुदानित शाळांमधील सर्व शाळांमध्ये शालेय सुट्टी वगळता दर दिवशी मोफत एकवेळ माध्यान्ह आहार दिला जाईल.

(2) उपकलम (1)च्या उपवाक्य (b) मधील संदर्भातील प्रत्येक शाळा व जेवण बनवणे, पिण्याचे पाणी व स्वच्छतेसाठीच्या सुविधा असलेली *अंगणवाडी*.

अटीनुसार केंद्र सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यतेप्रमाणे मध्यावर्ती स्वयंपाकगृहाद्वारे जेवण शिजवण्यासाठी शहरी विभागामध्ये सुविधा पुरवावी.

बाल कुपोषण प्रतिबंध आणि व्यवस्थापन

6. अनुसूची II मधील निर्दिष्टीत पौष्टिक मानदंड पूर्ण करण्यासाठी कुपोषित मुले शोधून त्यांना मोफत जेवण स्थानिक *अंगणवाडी*च्या माध्यमातून राज्य सरकारने पुरवणे आवश्यक आहे.

अधिकार वास्तवात आणण्यासाठी योजनांची अंमलबजावणी.

7. केंद्र सरकारने विहित केल्याप्रमाणे केंद्र सरकार व राज्य सरकारमधील खर्चासह मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कलम 4, 5 व 6 अंतर्गत दिलेल्या हक्कानुसार योजनांची अंमलबजावणी राज्य सरकारने करावी.

## अध्याय III

## खाद्य सुरक्षा भत्ता

काही प्रकरणी अन्न सुरक्षा भत्ता प्राप्तीचा हक्क.

8. केंद्र सरकारने निर्दिष्ट केल्यानुसार व अध्याय II अंतर्गत दिलेल्या हक्काप्रमाणे अन्नधान्य अथवा जेवणाची हक्क प्रमाणानुसार पुरवठा न झाल्यास प्रत्येक व्यक्तीला खाद्य सुरक्षा भत्ता हक्कानुसार अशा व्यक्तींना संबंधित राज्य सरकारला अदा करावा लागेल.

## अध्याय IV

## पात्र कुटुंबाची ओळख

लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत लोकसंख्येची व्याप्ती

9. केंद्र सरकारने ठरवल्याप्रमाणे कलम 3 च्या उपकलम (2) नुसार प्रत्येक राज्याच्या ग्रामीण व शहरी क्षेत्रातील लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत टक्केवारीची व्याप्ती असेल. राज्याच्या ग्रामीण व शहरी भाग अशामधील एकूण व्यक्तींच्या समावेशाबाबत यापूर्वीच प्रसिद्ध झालेल्या संख्येच्या जनगणनेनुसार अंदाजित लोकसंख्येच्या आधारावर मोजमाप केले जाईल.

राज्य सरकारने मार्गदर्शकतत्वे तयार करावी व प्राध्यान्य कुटुंबे ओळखावी.

10 (1) राज्य सरकार कलम 9 अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील ठरवण्यात आलेल्या व्यक्तींच्या संख्येनुसार ओळख देईल.

(a) सदर योजनेतील मार्गदर्शक तत्वानुसार कलम 3 च्या उपकलम (1) अंतर्गत निर्दिष्ट केल्या केल्याप्रमाणे अंत्योदय अन्न योजने अंतर्गत कुटुंबे समाविष्ट करण्यात येतील.

(b)निर्दिष्टीत केल्यानुसार राज्य सरकारने अशा मार्गदर्शक तत्वाप्रमाणे लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत उर्वरित कुटुंबांना प्राधान्य कुटुंब म्हणून समावेश करावा :

तरतुदीनुसार या उप कलमा अंतर्गत तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर पात्र कुटुंबाची ओळख तीनशे व पासष्ट दिवस कालावधीच्या आत त्वरित राज्य सरकारने पुरवणे आवश्यक आहे.

तरतुदीनुसार याचप्रमाणे अशा कुटुंबाची ओळख पूर्ण होईपर्यंत सध्याच्या लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केंद्र सरकारकडून अन्नधान्य पुरवठ्याची प्राप्ती राज्य सरकारला सुरूच राहील.

(2) उपकलम (1) अंतर्गत तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कलम 9 अंतर्गत ठरवण्यात आलेल्या ग्रामीण व शहरी भागातील व्यक्तींच्या संख्येप्रमाणे पात्र कुटुंबाची यादी राज्य सरकारला अद्ययावत करावी लागेल.

पात्र कुटुंबाच्या यादीचे प्रदर्शन व प्रकाशन.

11. राज्य सरकारने ओळख पात्र कुटुंबाची यादी लोकांसाठी उपलब्ध करून व ती ठळकपणे प्रदर्शित करावी.

## अध्याय V

## लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये सुधारणा.

लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीत सुधारणा.

12 (1) या कायद्यात दिलेल्या भूमिकेनुसार लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये केंद्र व राज्य सरकारने प्रगतीनुसार आवश्यक क्रांती घडवण्याचा प्रयत्न करावा.

(2) सुधारणामध्ये खालील बाबी समाविष्ट असतील -

(a) लक्ष्यित सार्वजनिक वितरण निर्गम यंत्रणेतून अन्नधान्य घरापर्यंत पोच करणे.

(b) सर्व पातळीवर व्यवहाराची पारदर्शकता जपण्यासाठी सुरवातीपासून ते शेवटपर्यंत सगंणीकृत माहिती व संवाद साधणे व पर्यायी मार्ग टाळणे.

(c) या कायद्या अंतर्गत योग्य लक्ष्यित लाभ हक्क प्राप्त लाभार्थ्यांना देण्यासाठी बायोमेट्रीक माहितीद्वारे अद्वितीय ओळखीसाठी 'आधार' चा वापर करावा.

(d) पूर्ण पारदर्शी नोंदी.

(e) सर्वांचा सहभाग अथवा स्वस्त धान्य दुकान व्यवस्थापन अथवा स्वस्त धान्य दुकानाच्या परवान्यासाठी पंचायत, स्वयं सेवी संस्था, स्वयं सहाय्य गट, सहकारी संस्था आदी सार्वजनिक संस्थांना प्राधान्य द्यावे.

(f) काही कालावधीनंतर सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वस्तुंच्या पुरवठ्यामध्ये विविधता आणावी.

(g) धान्य बँक व स्थानिक सार्वजनिक वितरणाला सहाय्य देणे.

(h) केंद्र सरकारने विहित केल्याप्रमाणे व अशा क्षेत्रातील अध्याय 2 मधील लक्ष्यित लाभार्थांना त्यांच्या निर्दिष्ट हक्कानुसार अन्नधान्य प्राप्तीसाठी कॅश ट्रान्सफर, खाद्य कुपन अथवा इतर योजना अशा योजना लागू करणे.

## अध्याय VI

## महिला सशक्तीकरण

रेशन कार्डे देण्यासाठी कुटुंब प्रमुख म्हणून अठरा वर्षे अथवा त्यावरील वयोगटातील महिला.

13. (1)प्रत्येक पात्र कुटुंबातील ऐंशी वर्षे वयापेक्षा जास्त वय असलेली वयोवृद्ध महिला कुटुंब प्रमुख म्हणून रेशन कार्ड जारी करू शकेल.

(2)एखाद्या कुटुंबात अठरा वर्षे वयोगटातील अथवा त्यावरील वयोगटातील अथवा महिला नसल्यास, परंतु अठरा वर्षाखालील महिला सदस्य असल्यास, त्या कुटुंबातील वडीलधारी पुरूष सदस्य रेशन कार्ड जारी करण्याच्या उद्देशासाठी कुटुंब प्रमुख राहील व महिला सदस्य अठरा वर्षे पूर्ण केल्यानंतर कुटुंब प्रमुख म्हणून अशा रेशन कार्डवरील अशा पुरूष सदस्याची जागा घेईल.

## अध्याय VII

## तक्रार निवारण यंत्रणा

अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा.

14. कॉल सेंटर्स, हेल्पलाईन्स, अधिकृत नोडल अधिकारी अथवा अशा प्रकारची निर्दिष्ट यंत्रणांचा समावेश करून प्रत्येक राज्य सरकारने अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करावी.

जिल्हा तक्रार निवारण अधिकारी.

15 (1) या कायद्याच्या हक्काची अंमलबजावणी व अध्याय II अंतर्गत जेवण अथवा अन्नधान्य हक्काच्या वितरणासंदर्भातील प्रकरणाविषयीची पिडीत व्यक्तीची तक्रार गतीमान व कार्यक्षमरित्या निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी राज्य सरकारने जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

(2) जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्तीसाठीची शैक्षणिक पात्रता व त्यांचे अधिकार राज्य सरकारने निर्दिष्ट करायला हवेत.

(3) जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याच्या नियुक्तीची पद्धत व अटी व शर्ती राज्य सरकारने निर्दिष्ट करायला हव्या.

(4) जिल्हा तक्रार निवारण अधिकारी व इतर कर्मचाऱ्याचा पगार व भत्ता व त्यांच्या योग्य कार्यासाठी आवश्यक असलेल्या इतर खर्च राज्य सरकारने पुरवायला हवा.

(5) उपकलम (1) मध्ये संदर्भ असलेल्या अधिकाऱ्याने जेवण अथवा अन्नधान्य हक्काचा पुरवठा न करण्याविषयक व त्यासंदर्भातील तक्रारी ऐकायला हव्यात व त्यांचे निवारण करण्यासाठी राज्य सरकारने निर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये आवश्यक कारवाई करायला हवी.

(6)उपकलम (1) मध्ये संदर्भ असलेल्या अधिकाऱ्याने कोणत्याही तक्रारदार अथवा अधिकारी अथवा प्राधिकरणाविरोधात आदेश जारी केल्यानंतर जर कोणी तक्रार निवारणाविषयी समाधानी न झाल्यास त्यांनी अशा आदेशा विरोधात राज्य आयोगाकडे याचिका दाखल करावी.

(7)) उप कलम (6) अंतर्गत प्रत्येक याचिका अशा पद्धतीने व राज्य सरकारने निर्दिष्ट केलेल्या वेळेमध्येच सादर करावी.

राज्य अन्न आयोग.

16. (1) या कायद्याची अंमलबजावणीचा आढावा व देखभालीच्या उद्देशासाठी प्रत्येक राज्य सरकारने अधिसूचनेद्वारे राज्य अन्न आयोगाची नियुक्ती करावी.

(2) राज्य आयोगामध्ये –

(a) अध्यक्ष

(b) पाच इतर सदस्य व

(c) सदस्य सचिव, हे राज्य सरकारचे अधिकारी असून सरकारच्या सह सचिव पदाच्या श्रेणी पेक्षा कमी असता कामा नये.

अटीनुसार अध्यक्ष, सदस्य अथवा सदस्य सचिव म्हणून किमान दोन महिला असायला हव्यात.

अटीनुसार पुढीलप्रमाणे अध्यक्ष, सदस्य अथवा सदस्य सचिव म्हणून अनुसूचित जाती मधील एक व्यक्ती व अनुसूचित जमातीमधील एक व्यक्तीचा समावेश असायला हवा.

(3) अध्यक्ष व इतर सदस्यांची खालील व्यक्तींमधून नियुक्ती करावी-

(a)कृषी, नागरी पुरवठा, पोषण, आरोग्य अथवा कोणत्याही तत्सम क्षेत्रातील अन्न सुरक्षा, धोरण बनवणे व प्रशासकीय अनुभव व ज्ञान असलेली जर कोणी अथवा अखिल भारतीय सेवेतील सदस्य अथवा राज्याच्या अथवा केंद्रशासित मधील कोणत्याही इतर नागरी सेवेतील अथवा राज्य अथवा केंद्रशासित अंतर्गत नागरी पदाचा ताबा असलेली व्यक्ती.

(b) कृषी, कायदा, मानवी हक्क, सामाजिक सेवा, व्यवस्थापन,पोषण, आरोग्य, अन्न धोरण अथवा सार्वजनिक प्रशासनमधील ज्ञान व अनुभव असलेली सार्वजनिक जीवनात नावलौकीक असलेली व्यक्ती अथवा

(c)गरीबांच्या अन्न व पोषण सुधारणा संबंधित कामाची नोंद सिद्ध केलेली व्यक्ती.

(4) अध्यक्ष व प्रत्येक इतर सदस्याचा ताबा घेतल्यापासून वयाच्या 5 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये  व अशा व्यक्ती पुर्ननियुक्तीसाठी पात्र असतील.

अटीनुसार अध्यक्ष व इतर सदस्य वयाच्या पासष्ट वर्षे पूर्ण केल्यानंतर या पदावर राहू शकत नाही.

(5) राज्य आयोगाचे अध्यक्ष, इतर सदस्य व सदस्य सचिव नियुक्तीची पद्धत व इतर अटी व शर्ती व राज्य आयोगाच्या ( अशा बैठकांच्या कोरमसह) बैठकीची प्रक्रीया व वेळ, ठिकाण व त्यांचे अधिकार राज्य सरकारने निर्दिष्ट केल्यानुसार राहतील.

(6) राज्य आयोगाने खालील कार्ये हाती घ्यायला हवी,म्हणजे-

(a) राज्याच्या संबंधाने या कायद्याच्या अंमलबजावणीचे मुल्यांकन व संनियंत्रण.

(b) अध्याय 2 अंतर्गत दिलेल्या हक्काचया उलंघनाविरोधात तक्रार प्राप्तीनंतर अथवा *सुमोटो* चौकशी.

(c) या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारला सल्ला देणे.

(d) या कायद्यात विहित केल्युसार व्यक्तींना सक्षम करण्यासाठी त्यांच्या पूर्णपणे निर्दिष्ट हक्कांविषयीच्या अन्न व पोषणा संदर्भातील योजनांची प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकार, त्यांच्या संस्था, स्वायत्त संस्था तसेच अशा सेवा देण्याऱ्या बिगर सरकारी संस्थांना सल्ला देणे.

(e) जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याच्या आदेशा विरोधातील याचिकेवर सुनावणी घेणे.

(f) राज्य सरकारने विधानसभेत सादर करण्यासाठी वार्षिक अहवाल तयार करणे.

(7) राज्य आयोग कार्यक्षम पद्धतीने कार्यरत ठेवण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक कर्मचारी आदीं आवश्यकतेनुसार राज्य सरकारने राज्य आयोगाला उपलब्ध करावे.

(8)  उप कलम (7) अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसह त्यांचा पगार, भत्ता, सेवेतील शर्तीची पद्धत राज्य सरकारने निर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

(9) राज्य सरकार अध्यक्ष अथवा कोणत्याही सदस्याला कार्यालयातून काढू शकतील, जे कोणी-

(a) कोणत्याही क्षणी निर्णय घेण्यास असक्षम ठरले असल्यास अथवा

(b) सदस्य म्हणून शारीरिक व मानसिकदृष्ट्या असमर्थ ठरल्यास अथवा

(c)  राज्य सरकारच्या मतानुसार गुन्ह्यामध्ये दोषी ठरल्यास अथवा

(d) सदस्य म्हणून कार्यरत असताना आर्थिक अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या हितसंबंधाद्वारे अपायकारक ठरत असल्यास अथवा

(e)आपल्या पदाचा गैरवापर केल्याने सार्वजनिक हितासाठी त्यांचे कार्यालयात राहणे हानीकारक ठरते.

(10) उपकलम (9) च्या उपवाक्य (d) अथवा उपवाक्य (e) अंतर्गत अशा कोणत्याही अध्यक्ष अथवा सदस्याला त्याचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध न करता काढून टाकता येत नाही.

राज्य आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, सदस्य सचिव व इतर कर्मचाऱ्यांचा पगार व भत्ता.

17. राज्य आयोगाचे कार्य योग्य रित्या चालवण्यासाठी राज्य सरकारकडून अध्यक्ष, इतर सदस्य, सदस्य सचिव, सहकारी कर्मचाऱ्यांना पगार व भत्ता व इतर प्रशासकीय खर्च पुरवणे आवश्यक आहे.

राज्य आयोगाचे कार्य पार पाडणारा कोणताही आयोग अथवा मंडळाचे पदनाम.

18. कलम 26 मधील संदर्भातील राज्य आयोगाची कार्ये व अधिकार पार पाडण्यासाठी आवश्यक मंडळ अथवा कोणताही वैधानिक आयोगाची नियुक्ती राज्य सरकारने आवश्यकता भासल्यास अधिसूचना जारी करून करायला हवी.

सह राज्य अन्न आयोग.

19. केंद्र सरकारच्या मान्यतेने या कायद्याचा उद्देश पार पाडण्यासाठी कलम 16 च्या उपकलम (1) असे काही असले तरीसुद्धा दोन व त्यापेक्षा जास्त राज्यांना सह राज्य अन्न अयोग स्थापन करता येईल.

चौकशी संदर्भातील अधिकार.

20. (1) कलम 16 च्या उप कलम (6) च्या उपवाक्य (b) व (e) मधील संदर्भ असलेल्या कोणत्याही प्रकरणी चौकशी करताना राज्य आयोगाला नागरी संहिता प्रक्रीया 1908 अंतर्गत खटला दाखल करण्याचा प्रयत्नासाठी दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार देण्यात आले आहे व प्रामुख्याने खालील प्रकरणी –

1908 चा 5

(a) कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीत हजर राहण्यास फर्मावणे व अंमलबजावणी व शपथेवर चौकशी करणे.

(b)कोणतेही दस्ताऐवज सादर करण्यास सांगणे.

(c) प्रतिज्ञापत्रानुसार पुरावे प्राप्त करणे.

(d) कोणत्याही न्यायालय अथवा कार्यालयातून आवश्यक सार्वजनिक नोंदी अथवा प्रति मागवून घेणे.

(e) साक्षीदारांच्या तपासणी व दस्ताऐवजासाठी अधिपत्रे जारी करणे.

(2) समान कार्यक्षेत्र असलेल्या न्यायदंडाधिकाऱ्यांकडे कोणताही खटला देण्याचा अधिकार राज्य आयोगाला आहे आणि ज्या न्यायदंडाधिकाऱ्यांकडे असे कोणतेही खटले दिल्यास फौजदारी संहिता प्रक्रीया, 1973 च्या कलम 346 अंतर्गत संशयिता विरोधातील तक्रारीवर त्यांना सुनावणी घेता येते.

1974 चा 2

रिक्तपदे आदीं राज्य आयोगाची कार्यवाही रद्द न करणे.

21. कोणताही कायदा अथवा राज्य आयोगाची कार्यवाही खालीलपैकी कोणत्याही कारणासाठी अवैध ठरू शकेल –

(a) कोणतीही रिक्तता अथवा राज्य आयोगाच्या घटनेतील कोणतीही त्रूटी अथवा,

(b) राज्य आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य व्यक्तींच्या नियुक्तीमध्ये कोणतीही त्रूट असल्यास अथवा

(c) खटल्याच्या प्राधान्यावर परिणाम न करता राज्य आयोगाच्या प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकरचा अनियमितपणा आढल्यास.

## अध्याय VIII

## अन्न सुरक्षेसाठी केंद्र सरकारची जबाबदारी

केंद्र सरकारकडून केंद्र सरकारच्या साठ्यातून राज्य सरकारला आवश्यक अन्नधान्याचे वाटप करणे.

22. (1) कलम 3 अंतर्गत दिलेल्या हक्काप्रमाणे लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत राज्य सरकारला केंद्रीय साठ्यामधून वाटप केलेल्या आवश्यक प्रमाणातील अन्नधान्य, पात्र कुटुंबातील व्यक्तींना अन्न धान्य नियमितपणे पुरवठा आणि अनुसूची I निर्दिष्टीत किमतीमध्ये केंद्र सरकारने सुनिश्चित करायला हवा.

(2) कलम 10 अंतर्गत प्रत्येक राज्याने ठरलेल्या पात्र कुटुंबातील व्यक्तींच्या संख्येनुसार केंद्र सरकारने अन्नधान्याचे वाटप करायला हवे.

(3) अधीसूची 1 मधील पात्र कुटुंबामधील व्यक्तींना निर्दिष्टीत केलेल्या किमतीप्रमाणे राज्य सरकारला कलम 4, 5 व कलम 6 अंतर्गत हक्कदार असलेल्यांना केंद्र सरकारने अन्नधान्य पुरवठा करायला हवा.

(4) उप कलम (1) च्या पूर्वग्रहाव्यतिरिक्त, केंद्र सरकार –

(a) आपल्या स्वतःच्या संस्थेकडून व राज्य सरकार व त्यांच्या संस्थांकडून केंद्रीय साठ्यामधून अन्नधान्य खरेदी करेल.

(b) राज्यांना अन्नधान्य वाटप करेल.

(c) प्रत्येक राज्यात केंद्र सरकारने अधिकृत केलेल्या गोदामापर्यंत वाटपाप्रमाणे अन्नधान्याची वाहतूक पुरवठा करणे.

(d) केंद्र सरकारने निर्दिष्टीत केल्याप्रमाणे व अशा नियमांनुसार आंतरराज्य वाहतूक, अन्नधान्य हाताळणी व स्वस्त धान्य दुकान विक्रकेत्यांना देण्यात येणाऱ्या मानधनासह आवश्यक खर्चाचे अर्थसहाय्य राज्य सरकारला पुरवेल आणि

(e) विविध पातळीवर आवश्यकतेनुसार अत्याधुनिक व शास्त्रीय साठवणूक सुविधा तयार करणे व देखरेख ठेवणे.

काही प्रकरणी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला निधीसाठी तरतूद.

23. केंद्रीय साठ्यामधून राज्याला अन्नधान्याचा कमी पुरवठा झाल्यास, केंद्र सरकारने निर्दिष्टीत केल्याप्रमाणे अध्याय 2 अंतर्गत जबाबदारी पार पाडण्यासाठी केंद्र सरकारने अपुऱ्या अन्नधान्य पुरवठ्यासाठी निधी पुरवायला हवा.

## अध्याय IX

## अन्न सुरक्षेसाठी राज्य सरकारची जबाबदारी

अन्न सुरक्षेसाठीच्या योजनेची अंमलबजावणी व देखरेख.

24 (1)राज्यातील लक्ष्यित लाभार्थ्यांना सुनिश्चित अन्न सुरक्षेच्या प्रत्येक योजनेसाठी केंद्र सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केंद्र सरकारच्या विविध खात्याच्या व विविध मंत्रालयाच्या योजनांची व आपल्या स्वतःच्या योजनांवर निरिक्षण ठेवण्यास व अंमलबजावणी करण्यास राज्य सरकार जबाबदार राहील.

(2) लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत, राज्य सरकारचे कर्तव्य–

(a) अधीसूची १ मध्ये निर्दिष्टीत किमतीप्रमाणे राज्यातील केंद्र सरकारच्या अधिकृत गोदामातून अन्नधान्य वितरण ताब्यात घेण्याबरोबर त्यांच्या अधिकृत संस्थांमार्फत प्रत्येक स्वस्त धान्य दुकानापर्यंत अन्नधान्याचे वाटप आंतरराज्य वाटप वितरणाद्वारे करणे आणि

(b) अधीसूची I मध्ये निर्दिष्टीत किमतीप्रमाणे हक्कदार व्यक्तीला अन्नधान्याचा पुरवठा करणे अथवा प्रत्यक्षात वितरण झाल्याची खात्री करून घेणे.

(३) कलम 4, 5 व कलम 6 अंतर्गत देण्यात आलेल्या हक्कानुसार आवश्यक अन्नधान्यासाठी,अधीसूची I मध्ये निर्दिष्टीत किमतीप्रमाणे पात्र कुटुंबातील व्यक्तींना राज्यातील केंद्र सरकारच्या अधिकृत गोदामातून अन्नधान्याचे वितरण करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर राहिल आणि वरील कलमानुसार निर्दिष्टीत लाभाच्या हक्काप्रमाणे वितरण झाल्याची खात्री करून घेणे.

(4)अध्याय II अंतर्गत व्यक्तीच्या हक्कानुसार अन्नधान्य अथवा जेवण हक्क प्रमाणाप्रमाणे पुरवठा

न झाल्यास, कलम 8 मधील निर्दिष्टीत अन्न सुरक्षा भत्ता देण्याची जबाबदारी राज्य सरकारची राहील.

(5) लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कार्यक्षम कृतीसाठी प्रत्येक राज्याने–

(a) लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत आवश्यक पुरेसे अन्नधान्य सामावून घेऊन, राज्य, जिल्हा व गट पातळीवर शास्त्रीय साठवणूक सुविधा तयार करणे व देखभाल करणे.

(b) त्यांच्या धान्य व नागरी पुरवठा महामंडळ व इतर अधिकृत संस्थांनी योग्य क्षमता बळकट करणे.

1955 चा 10

(c ) वेळोवेळी दुरूस्ती केल्यानुसार जीवनावश्यक वस्तू कायदा, 1955 अंतर्गत तयार केलेला सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश, 2001 च्या आवश्यक तरतुदीप्रमाणे स्वस्त धान्य दुकानांसाठी परवाना देण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था स्थापन करणे.

## अध्याय X

## स्थानिक अधिकारीणीची जबाबदारी

आपल्या भागात स्थानिक अधिकारीणीकडून लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीची अंमलबजावणी.

25 (1) आपल्या संबंधित क्षेत्रामध्ये या कायद्याची अंमलबजावणी योग्यरित्या करण्यासाठी स्थानिक अधिकारीणी जबाबदार राहणार आहे.

(2) उपकलम (1) च्या पूर्वग्रहाव्यतिरिक्त, लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार अधिसूचना जारी करून अतिरिक्त जबाबदारी स्थानिक अधिकारीणीला देऊ शकेल.

स्थानिक अधिकारीणीची कर्तव्ये.

26. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या खात्याच्या व मंत्रालयाच्या विविध योजनांची अंमलबजावणीसाठी, या कायद्यातील तरतुदींमधील अंमलबजावणीच्या तयारीसाठी संबंधित राज्य सरकारने अधिसूचना जारी करून दिलेली कर्तव्ये आणि जबाबदारी पार पाडण्यासाठी स्थानिक अधिकारीणी जबाबदार राहील.

## अध्याय XI

## पारदर्शकता व उत्तरदायित्व

लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीच्या नोंदी उघड करणे.

27. राज्य सरकारने निर्दिष्टीत केल्याप्रमाणे सर्व लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीशी निगडीत दस्ताऐवज जनतेसाठी उपलब्ध करायला हवेत आणि जनतेच्या निरीक्षणासाठी खुले करायला हवे.

सामाजिक लेखापरिक्षण करणे.

28 (1) स्वस्त धान्य दुकान, लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली व इतर कल्याणकारी योजनांच्या कार्याचे कालबद्ध सामाजिक लेखापरिक्षण आयोजित किंवा आयोजन राज्य सरकारने अधिकृत केल्याप्रमाणे प्रत्येक स्थानिक अधिकारीणी अथवा कोणत्याही इतर अधिकारीणी अथवा मंडळाने करायला हवे.

(2) आवश्यकता भासल्यास केंद्र सरकार, अशा प्रकारचे लेखापरिक्षण स्वतंत्र अनुभवी संस्थांमार्फत सामाजिक लेखा परिक्षण आयोजित अथवा आयोजन करू शकते.

दक्षता समित्यांची स्थापना.

1955 चा 10

29 (1) लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीचे योग्य कार्ये पार पाडण्यासाठी व पारदर्शता सुनिश्चित करण्यासाठी आणि अशा पद्धतीची कार्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी, प्रत्येक राज्य सरकारांनी वेळोवळी दुरूस्ती केल्याप्रमाणे जीवनावश्यक वस्तु कायदा, 1955 अंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश, 2001 मध्ये निर्दिष्टीत केल्यानुसार राज्य, जिल्हा, गट व स्वस्त धान्य दुकान पातळीवर राज्य सरकारने निर्दिष्टीत केल्याप्रमाणे स्थानिक अधिकारीणी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला व निराधार व्यक्ती अथवा अपंग अशा व्यक्तींना प्रतिनिधीत्व द्यायला हवे.

(2) दक्षता समिती खालील कार्ये पार पाडतील –

(a) या कायद्या अंतर्गातील सर्व योजनांच्या अंमलबजावणीची नियमित देखरेख .

(b) या कायद्यातील तरतुदींचे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन केल्यास लेखी माहिती जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याला देणे.

(c) समितीला कोणत्याही प्रकारचा निधिचा व अधिकाराचा दुरूपयोग केल्याचे आढळून आल्यास त्याची लेखी माहिती जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याला देणे.

## अध्याय XII

## अन्न सुरक्षा अत्याधुनिक करण्यासाठी तरतूदी

दुरस्थ क्षेत्र, डोंगराळ व आदीवासी भागातील लोकांसाठी अन्न सुरक्षा.

30. या कायद्याची तरतूद व निर्दिष्टीत हक्क पार पाडण्यासाठीच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी

केंद्र सरकार व राज्य सरकारने, प्रामुख्याने ज्या ठिकाणी जाण्यास कठिणता निर्माण होणाऱ्या ग्रामीण भाग व इतर भागातील  डोंगरावरील व आदिवासी भागातील गरजू घटकांच्या अन्न सुरक्षेच्या सुनिश्चिततेसाठी विशेष लक्ष केंद्रीत करायला हवे.

राष्ट्रीय सुरक्षा व पुढील आवश्यक अन्नासाठी पावले उचलणे.

31. केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक अधिकारीणीने अत्याधुनिक अन्न व पोषण सुरक्षाचा उद्देश गाठण्यासाठी अधीसूची ३ मधील निर्दिष्ट उद्दिष्टे प्रगतीशिलरित्या गाठण्याची पराकाष्ठा करायला हवी.

## अध्याय XIII

## संकीर्ण

इतर कल्याणकारी योजना.

32. (1) या कायद्यातील तरतुदीनुसार केंद्र सरकार व राज्य सरकारला इतर अन्नस्थित कल्याणकारी योजना तयार करण्यासाठी अथवा पुढे नेण्यासाठी कोणीही रोखू शकत नाही.

(2) या कायद्यात काहीही अंर्तभूत असले तरी, राज्य सरकार आपल्या स्वतःच्या स्त्रोतानुसार या कायद्या अंतर्गत पुरवण्यात आलेल्या लाभापेक्षा जास्त लाभ देणाऱ्या योजना अथवा अन्न अथवा पोषणासंदर्भातील आराखडा तयार करण्यासाठी अथवा पुढे नेण्यासाठीच्या योजना मार्गी लावू शकेल.

दंड

33. जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याने मुक्त करण्याची शिफारस वाजवी कारण न देता अथवा अशा प्रकारची शिफारस जाणूनबुजून टाळून ती पुरवण्यास अपयशी ठरल्याचे राज्य आयोगाने वेळावेळी कोणत्याही तक्रारीवर अथवा आव्हानावर निर्णय घेताना कोणताही सरकारी कर्मचारी अथवा अधिकारी दोषी आढळल्यास त्याला पाच हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

अटीनुसार कोणताही दंड देण्यापूर्वी सरकारी कर्मचारी अथवा सरकारी अधिकाऱ्याला प्रकरणानुसार त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिली जाईल.

निवाडा करण्याचा अधिकार

34. (1) कलम 33 अंतर्गत दंड देण्याच्या उद्देशासाठी राज्य आयोगाला कोणत्याही प्रकारचा दंड देण्याच्या उद्देशाने कोणत्याही व्यक्तीला त्याचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वाजवी संधी दिल्यानंतर निर्दिष्टीत पद्वतीने आपल्या सदस्याला अधिकृत अधिकारी म्हणून चौकशी करण्याचे अधिकार देता येतील.

(2) चौकशी सुरू असताना अधिकृत अधिकाऱ्याला समन्स व परिचित कोणत्याही व्यक्तीला प्रकरणाविषयीची तथ्य व परिस्थिती पडताळून पाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे अथवा अधिकृत अधिकाऱ्याचे

मते उपयोगी येणारे कोणत्याही प्रकारचे दस्ताऐवज सादर करण्याचे अथवा या प्रकरणाशी संबंधित चौकशी करण्याचे अधिकार दिले जातील आणि जर, अशा चौकशीमध्ये कलम ३३ च्या तरतुदीप्रमाणे वाजवी कारण न देता जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याने मदत पुरवण्याची शिफारस पुरवण्यास अथवा अशा प्रकारची शिफारस जाणूनबुजून टाळून ती पुरवण्यास अपयशी ठरल्याने, ते अशा प्रकारचा दंड लागू करू शकतात.

केंद्र सरकार व राज्य सरकारला सोपवलेले अधिकार.

35. (1) राज्य सरकार अथवा केंद्र सरकारचा गौण अधिकारी अथवा राज्य सरकार अधिसूचनेत निर्देशीत करून अशा परिस्थितीच्या व मर्यादेच्या अधीनतेनुसार हे अधिकार केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे केंद्र सरकारला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार ( नियम तयार करण्याच्या अधिकारा व्यतिरिक्त) निर्देश देऊ शकतात.

(2) अधिसूचनेद्वारे निर्देशीत केल्याप्रमाणे गौण अधिकारी अशा परिस्थितीच्या व मर्यादेच्या अधीनतेनुसार राज्य सरकारला अधिसूचनेद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (नियम तयार करण्याच्या अधिकारा व्यतिरिक्त) निर्देश देऊ शकतात.

कायद्याचे महत्वाचे परिणाम.

36. या कायद्याची तरतूद अथवा कोणताही इतर कायदा लागू असताना त्याअंतर्गत योजना तयार केल्यास त्याचे कोणतेही अंतर्भूत असलेले परिणाम अथवा अशा कायद्याचे कोणतेही मापक परिणाम लागू शकतात.

अनुसूची दुरूस्तीसाठी अधिकार

37. (1) अधिसूचनेद्वारे आवश्यकतेनुसार अथवा फायदेशीर ठरल्याचे समाधान जर केंद्र सरकारला झाल्यास, ते अनुसूची I अथवा अनुसूची II अथवा अनुसूची III अथवा अनुसूची IV ची दुरूस्ती करील आणि त्यानंतर आवश्यकतेनुसार अनुसूची I अथवा अनुसूची II अथवा अनुसूची III अथवा अनुसूची IV ची दुरूस्ती मानण्यात येईल.

(2) उपकलम (1) अंतर्गत प्रत्येक अधिसूचनेची प्रत, अधिसूचना जारी झाल्यानंतर लवकरात लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर सादर करायला हवी.

सूचना देण्यासाठी केंद्र सरकारला अधिकार.

38. या कायद्यातील तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी राज्य सरकारकडून व्हावी यासाठी केंद्र सरकारने वेळोवेळी आवश्यकतेनुसार अशा प्रकारच्या सूचना द्यायला हवेत आणि राज्य सरकारने अशा सूचनांचे पालन करायला हवे.

नियम बनवण्यासाठी केंद्र सरकारला अधिकार.

39. (1) केंद्र सरकारने , राज्य सरकाशी सल्ला मसलत करून आणि अधिसूचनेद्वारे या कायद्यातील

तरतूदींसाठी नियम तयार करायला हवेत.

(2) विशेषतः व पूर्वग्रहाव्यतिरिक्त दिलेल्या अधिकारानुसार, खालील सर्व अथवा काही प्रकरणी असे नियम करावित, म्हणजेः-

(a) कलम 4 च्या उपवाक्य (b) अंतर्गत गरोदर महिला व स्तनपान मातेला मातृत्व लाभ पुरवण्यासाठी कॉस्ट शेअरींगसह योजना.

(b) कलम 7 अंतर्गत कॉस्ट शेअरींगसह कलम 4, 5 व कलम 6 अंतर्गत हक्कानुसार समाविष्ठ योजना.

(c ) कलम 8 अंतर्गत वैयक्तीक हक्कासाठी रक्कम, वेळ व अन्न सुरक्षा भत्त्या देण्याची पद्धत.

(d) कलम 12 च्या उप कलम (2) च्या उपवाक्य (h) अंतर्गत पद्धत व अशा भागातील लक्ष्यित लाभार्थ्यांना त्यांच्या हक्कानुसार अन्नधान्य प्राप्ती खात्रीसाठी कॅश ट्रान्सफर, अन्न कूपन्स अथवा इतर योजना मार्गी लावणे.

(e) कलम 22 च्या उप कलम (4) च्या उपवाक्य ( d) अंतर्गत राज्य सरकारला येत असलेल्या खर्चासाठी सहाय्य पुरवण्याची पद्धत व नियम.

(f) कलम 23 अंतर्गत अन्नधान्याचा अपुरा पुरवठा झाल्यास केंद्र सरकारकडून राज्य सरकारला पुरवण्यात येणाऱ्या निधीची पद्धत.

(g) कोणतीही अन्य बाब अथवा निर्दिष्टीत केल्यानुसार अथवा केंद्र सरकारने नियमाद्वारे तरतुद केल्याप्रमाणे.

(3) या कायद्या अंतर्गत केंद्र सरकारने तयार केलेला प्रत्येक नियम, तयार केल्यानंतर लवकरात लवकर,अधिवेशन सुरू असताना संसदेच्या प्रत्येक सभागृहात, एका अधिवेशनात अथवा दोन अथवा लागोपाठ त्यापेक्षा जास्त अधिवेशनात सादर करायला हवा आणि जर, अधिवेशन संपुष्टात आल्यानंतर लवकरच येणाऱ्या अधिवेशनात अथवा त्यानंतरच्या अधिवेशनात, नियमाच्या कोणत्याही सुधारणाविषयी दोन्ही सभागृहामध्ये एकवाक्यता झाल्यास अथवा नियम न करण्याची दोन्ही सभागृहात एकवाक्यता झाल्यास, त्यानंतर फक्त सुधारीत स्वरुपातील नियम कार्यान्वित राहिल अथवा त्याचा परिणाम होणार नाही. म्हणून, ज्याअर्थी अशी सुधारणा केल्यास अथवा त्या नियमा अंतर्गत कोणत्याही पूर्वग्रह व्यतिरिक्त वैधता विलोपीत झाल्यास नियम लागू होईल.

नियम बनवण्यासाठी राज्य सरकारला अधिकार.

40. (1) या कायद्याच्या तरतुदीनुसार केंद्र सरकारने तयार केलेले नियमानुसार नियम तयार करणे व या कायद्यानुसार सुसंगत व पूर्वीच्या प्रसिद्धीतील शर्तीनुसार आणि अधिसूचनेद्वारे राज्य सरकारला नियम तयार करता येतात.

(2) विशेषतः आणि पूर्वग्रहाव्यतिरिक्त दिलेल्या अधिकारानुसार, खालील सर्व अथवा काही प्रकरणी असे नियम पुरवण्यासाठी, म्हणजेः-

(a) कलम 10 च्या उप कलम (1) अंतर्गत प्राध्यान्य कुटुंबे ओळखण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.

(b) कलम 14 अंतर्गत अंतर्गत तक्रार समस्या निवारण यंत्रणा.

(c) कलम 15 च्या उप कलम (2) अंतर्गत जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्तीसाठीची शैक्षणिक अहर्ता व त्यांचे अधिकार.

(d) कलम 15 च्या उप कलम (3) अंतर्गत जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठीच्या अटी व शर्थी आणि पद्धत.

(e) कलम 15 च्या उप कलम (5) आणि (7) अंतर्गत जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्यांसमोर सादर करण्याच्या तक्रारीची आणि आव्हान अर्जाची सुनावणीचा कालावधी आणि पद्धत.

(f) कलम 16 च्या उप कलम (5) अंतर्गत राज्य आयोगाच्या अध्यक्ष, इतर सदस्य आणि सदस्य सचिव नियुक्तीसाठीच्या अटी व शर्ती आणि नियुक्तीची पद्धत, आयोगाच्या बैठकीची कार्यपद्धत आणि त्यांचे अधिकार.

( g) कलम 16 च्या उप कलम (8) अंतर्गत राज्य आयोगाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची पद्धत, त्यांचा पगार, भत्ता आणि सेवेच्या शर्ती.

(h) कलम 27 अंतर्गत लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीशी निगडीत दस्ताऐवज लोकांसाठी उपलब्ध करणे आणि लोकांच्या निरीक्षणासाठी खुले करण्याची पद्धत.

( i) कलम 28 अंतर्गत स्वस्त धान्य दुकान, लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली आणि इतर कल्याणकारी योजनांसाठी सामाजिक लेखापरिक्षण आयोजित करण्याची पद्धत.

(j) कलम 29 च्या उप कलम (1) अंतर्गत दक्षता समितीची रचना.

(k) कलम 43 अंतर्गत संस्थात्मक यंत्रणेचा वापर करण्यासाठी

( l) अन्य कोणतीही बाब अथवा विहित केल्याप्रमाणे अथवा राज्य सरकारने तयार केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार.

(3) या कायद्या अंतर्गत राज्य सरकारने तयार अथवा जारी केलेले प्रत्येक नियम, अधिसूचना आणि मार्गदर्शक तत्वे. तसेच तयार केल्यानंतर अथवा जारी केल्यानंतर लवकरात लवकर ज्या ठिकाणी दोन सभागृहे आणि ज्या ठिकाणी राज्य विधानसभेचे एक सभागृह असल्यास अशा ठिकाणी राज्य विधानसभेच्या प्रत्येक सभागृहासमोर सादर करायला हवेत.

योजना,मार्गदर्शक तत्वे आदींसाठी क्षणिक तरतूद.

41. या कायद्याच्या सुरवातीच्या तारखेपासून सध्या कार्यरत असलेली योजना, मार्गदर्शक तत्वे, आदेश आणि अन्नाचा दर्जा, तक्रार निवारण यंत्रणा, दक्षता समिती, पुढेही कार्यरत राहील आणि या कायद्याच्या अथवा तयार केलेल्या नियमां अंतर्गत अधिसूचित अथवा निर्देष्टित मार्गदर्शक तत्वे, आदेश आणि अन्नाचा दर्जा, तक्रार निवारण यंत्रणा, दक्षता समिती, योजना आदीं सुद्धा तोपर्यंत सुरूच राहतील.

अटीनुसार सदर योजना, मार्गदर्शक तत्वे, आदेश व अन्न दर्जा, तक्रार निवारण यंत्रणा, दक्षता समिती अंतर्गत काहीही केल्यास अथवा कोणतीही कृती केल्याचे मानण्यात येईल अथवा या कायद्याच्या तरतूदी अंतर्गत घेण्यात येईल आणि या कायद्या अंतर्गत कोणतीही कृती केल्यास अथवा काहीही केल्यास तोपर्यंत

आणि होईपर्यंत अधिक्रमित राहील.

त्रूटी दूर करण्यासाठी अधिकार.

42 (1) या कायद्याच्या तरतुदीनुसार जर कोणत्याही प्रकारची समस्या उद्‌भवल्यास, केंद्र सरकार आदेशाद्वारे, तसेच राजपत्रात प्रसिद्ध करून, अशा प्रकारची तरतूद करून, या कायद्याच्या तरतुदीमध्ये विसंगती न आणता, आवश्यकतेनुसार अथवा गतीमान पद्धतीने अडचणी दूर करता येतात.

अटीनुसार या कायद्याची सुरवात झालेल्या तारखेपासून दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर या कलमा अंतर्गत आदेश तयार करता येणार नाही.

(2) या कलमा अंतर्गत तयार केलेला आदेश, तयार केल्यानंतर तो संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर सादर करायला हवा.

इतर बाबींसाठी संस्थात्मक यंत्रणेचा वापर.

43. राज्य सरकारने विहित केल्यानुसार केंद्र सरकार अथवा राज्य सरकारचे इतर कार्यक्रम अथवा इतर योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कलम 15 व 16 अंतर्गत नियुक्त अधिकारीणीचा वापर करून करता येईल.

फोर्स मेजूर

44. या कायद्या अंतर्गत युद्ध, पूर, अवर्षण, आग, वादळ अथवा भूकंपा या व्यतिरिक्त अशा व्यक्तींना जेवण अथवा अन्नधान्याच्या नियमित पुरवठ्यावर परिणाम झाल्यास या कायद्या अंतर्गत अशी व्यक्ती राज्य सरकार अथवा केंद्र सरकारकडून नुकसान भरपाईसाठी दावा करू शकते.

अटीनुसार केंद्र सरकार, नियोजन आयोगाशी सल्ला मसलत करून अशा व्यक्तींना जेवण अथवा अन्नधान्याच्या नियमित पुरवठ्यावर परिणाम झाल्याच्या सध्याच्या अथवा निर्माण झालेल्या स्थितीवर घोषणा करू शकतात अथवा नाही.

निरसन आणि व्यवृत्ति

वटहुकूम 2013 चा 7

45 (1) राष्ट्रीय अन्न सुरक्षा वटहुकूम 2013 याद्वारे मागे घेण्यात येत आहे.

(2) रद्द करणे असले की–

(a) पात्र कुटुंबाच्या कोणत्याही ओळखीसाठी अथवा कोणतीही कृती केल्यास अथवा काहीही केल्यास, अथवा

(b) कोणतेही अधिकार, हक्क, विशेषाधिकार, बंधन अथवा उत्तरदायित्व साधून झालेले अथवा झाल्यास अथवा

(c) तयार केलेली अथवा सूचना जारी केलेली कोणतीही मार्गदर्शक तत्वे अथवा

(d) कोणतेही अधिकार, हक्क, विशेषाधिकार, बंधन अथवा उत्तरदायित्व अशा वरीलप्रमाणे कोणतीही चौकशी तपासणी अथवा कोणतेही इतर कायदेशीर कामकाज आरंभ, आयोजित अथवा चालू ठेवल्यास, अथवा

(e) कोणत्याही अपराधाला कोणताही दंड लागू केल्यास,

सदर वटहुकूमा अंतर्गत या कायद्याच्या तरतुदी अंतर्गत केल्यास, घेतल्यास,मानल्यास, संपादन , तयार, जारी , प्रारंभ, आयोजित, सुरू अथवा लागू करता येईल.

## अनुसूची I

( कलम 3(1), 22(1) व (3) आणि 24(2), (3) पहा)

लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत अनुदानित रक्कम

कलम 3 अंतर्गत पात्र कुटुंबांना हक्कानुसार अन्नधान्य या कायद्याची सुरवात झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत तांदूळ 3 रुपये प्रति किलो, गहू दोन रुपये प्रति किलो व भरडलेले धान्य एक रुपये प्रति किलो पेक्षा कमी अनुदानित किंमतीमध्ये मिळेल आणि त्यानंतर अशी किंमत वेळोवळी केंद्र सरकारकडून स्थिर केली जाईल–

(1) गहू आणि भरडलेल्या धान्यासाठी किमान आधारभूत किंमत आणि

(2)तांदळासाठी साधित किमान आधारभूत किंमत, आहे त्यानुसार

## अनुसूची II

( कलम 4 ( a) , 5 (l) आणि 6)

पौष्टिक मानदंड

*पौष्टिक मानदंड*ः एकात्मिके बाल विकास योजनेनुसार पौष्टीक गरम शिजवलेले अन्न अथवा घरी नेण्यासाठीचे रेशन पुरवण्यासाठी 6 महिने ते तीन वर्ष, तीन वर्ष ते 6 वर्ष वयोगटातील मुलांना आणि गरोदर महिला व स्तनपान मातांसाठी पौष्टीक मानदंड आणि माध्यान्ह आहार योजने अंतर्गत प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांच्या मुलांसाठी पौष्टीक मानदंड खालील प्रमाणेः

| अ. क्र. | वर्गवारी | जेवणाचा प्रकार | कॅलरी (किलोकॅलरी) | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| 1. | मुले ( 6 महिने ते 3 वर्षे) | घरी नेण्याचे रेशन | 500 | 12 ते 15 |
| 2. | मुले ( ३ ते ६ वर्षे) | न्याहारी आणि गरम शिजवलेले अन्न | 500 | 12 ते 15 |
| 3. | मुले ( 6 महिने ते 6 वर्षे) जे कुपोषित | घरी नेण्याचे रेशन | 800 | 20 ते 25 |
| 4. | प्राथमिक वर्ग | गरम शिजवलेले अन्न | 450 | 12 |
| 5. | उच्च प्राथमिक वर्ग | गरम शिजवलेले अन्न | 700 | 20 |
| 6. | गरोदर महिला व स्तनपान माता | घरी नेण्याचे रेशन | 600 | 18 ते 20 |

## अनुसूची III

( कलम 31 पहा)

आधुनिक अन्न सुरक्षेसाठी तरतूदी

(1) शेतीमध्ये नवचैतन्य–

(a) लहान आणि मध्यम शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी शेती सुधारणाद्वारे उपाययोजना.

(b) शेतीतील गुंतवणूक वाढविणे, उदा. संशोधन व विकास, विस्तारीत सेवा, सुक्ष्म आणि लघु सिंचन आणि उत्पादकता आणि उत्पादन वाढवणे

(c) योग्य मोबदला देणारे भाव,सुलभनिवेश, पतसंस्था, सिंचन, वीज, पीक विमा आदींद्वारे शेतकऱ्यांना सुनिश्चित उदरनिर्वाह सुरक्षा पुरवणे.

(d) अन्न उत्पादनावर बंदी आणून जमीन व पाण्याचे होणारे असमर्थनीय अपवाहन टाळणे.

(2) खरेदी, साठवणूक आणि वाहतुकीसंदर्भातील हस्तक्षेप–

(a) भरडलेल्या धान्याच्या खरेदीसह प्रोत्साहन विकेंद्रीत खरेदी

(b) खरेदी कार्याचा भौगोलिक विभागणी

(c) आवश्यक विकेंद्रीत अत्याधुनिक व शास्त्रीय साठवणुकीमध्ये वाढ.

(d) अन्नधान्याच्या वाहतुकीसाठी प्रथम प्राधान्य देणे आणि अतिरिक्त ते जास्त खर्चित भागापासून

अन्नधान्य वाहतुकीसाठी रेल्वे लाईन क्षमतेचा विस्तार करण्याबाबतच्या सुविधेसह या उद्देशासाठी आवश्यक संख्येने रॅकचा पुरवठा करणे.

(3) इतर, प्रवेश–

(a) सुरक्षित आणि आवश्यक पिण्याचे पाणी आणि स्वच्छता.

(b) आरोग्य सेवा.

(c) पौंगडावस्थेतील मुलींना पोषणविषयक, आरोग्य आणि शिक्षणासाठी सहाय्य करणे.

(d) ज्येष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती आणि विधवांना आवश्यक निवृत्ती वेतन देणे.

## अधीसूची IV

( कलम 3(1) पहा)

राज्यनिहान अन्नधान्य साठा

| अ. क्र. | राज्याचे नाव | प्रमाण ( लाख टनामध्ये) |
|---|---|---|
| 1. | आंध्र प्रदेश | 32.10 |
| 2. | अरुणाचल प्रदेश | 0.89 |
| 3. | आसाम | 16.95 |
| 4. | बिहार | 55.27 |
| 5. | छत्तीसगड | 12.91 |
| 6. | दिल्ली | 5.73 |
| 7. | गोवा | 0.59 |
| 8. | गुजरात | 23.95 |
| 9. | हरीयाणा | 7.95 |
| 10. | हिमाचल प्रदेश | 5.08 |
| 11. | जम्मू आणि काश्मीर | 7.51 |
| 12. | झारखंड | 16.96 |
| 13. | कर्नाटक | 25.56 |
| 14. | केरळ | 14.25 |
| 15. | मध्यप्रदेश | 34.68 |
| 16 | महाराष्ट्र | 45.02 |
| 17. | मणिपूर | 1.51 |
| 18. | मेघालय | 1.76 |
| 19. | मिझोराम | 0.66 |

| | | |
|---|---|---|
| 20. | नागालँड | 1.38 |
| 21. | ओडीसा | 21.09 |
| 22. | पंजाब | 8.70 |
| 23. | राजस्थान | 27.92 |
| 24. | सिक्कीम | 0.44 |
| 25. | तामिळनाडू | 36.78 |
| 26. | त्रिपूरा | 2.71 |
| 27. | उत्तरप्रदेश | 96.15 |
| 28. | उत्तराखंड | 5.03 |
| 29. | पश्चिम बंगाल | 38.09 |
| 30. | अंदमान आणि निकोबार बेट | 0.16 |
| 31. | चंदीगड | 0.31 |
| 32. | दादरा आणि नगर हवेली | 0.15 |
| 33. | दमण आणि दीव | 0.07 |
| 34. | लक्षद्वीप | 0.05 |
| 35. | पांडीचेरी | 0.50 |
| | एकूण | 549.26 |